# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६२-२२** **दिनांक २३/०८/२०२२**

## मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन एकुण १,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत - पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १६/०८/२०२२ रोजी पहाटे ४.०० वा. सुमारास मिरा इस्टेट, नालासोपारा फाटा, नालासोपारा (पु.) येथे फिर्यादी नामे श्री. चंद्रमा बुक्का चौहान, वय २५ वर्षे, रा. मिरा इस्टेट, नालासोपारा फाटा, नालासोपारा (पु.) यांचे गाळयाचे बंद खिडकीचे लॅच लॉक उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन गाळयातील कामगार झोपलेले असतांना त्यांचे ०५ मोबाईल फोन कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरफोडी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी पेल्हार पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गु.रजि.नं. I ७०६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि.१६/०८/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेत असताना गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे सापळा रचुन आरोपीत नामे १) सलिम शेख, वय १९ वर्षे, २) सोहेल शेख, वय २० वर्षे व एक विधीसंघर्षग्रस्त बालक सर्व रा. नालासोपारा (पु.) यांस ताब्यात घेवुन, त्यांचेकडून अंगझडती दरम्यान वेगवेगळया कंपन्यांचे एकुण १३ मोबाईल फोन असा एकुण १,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीत क्र १) सलिम शेख, वय १९ वर्षे, २) सोहेल शेख, वय २० वर्षे यांना नमूद गुन्हयात दिनांक १८/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. नमूद आरोपीतांकडून पेल्हार पोलीस ठाणेत दाखल घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

### उघडकीस आलेले घरफोडीचे गुन्हे -

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. व कलम |
|---|---|---|
| ०१. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ७०६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८०, ३४ |
| ०२. | | गु.रजि.नं. I ७०८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८०, ३४ |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पो.ना. प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांनी पार पाडली आहे.

---- ०००० ----